शेतजमीन, वहिवाटीचे वाद केवळ दोन हजार रुपयांत मिटवा

शासनाची सलोखा योजना

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शेतजमिनीचा ताबा आणि वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपापसांतील वाद मिटविण्यासाठी शासनाने सलोखा योजना आणली आहे. एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे, दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांचे क्षेत्र अदलाबदल करण्यासाठी या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना घेता येणार आहे. यासाठी नोंदविण्यात येणाऱ्या दस्तांसाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क प्रत्येकी केवळ एक हजार रुपये शेतकऱ्यांना भरावे लागणार आहे.

सलोखा योजनेमुळे राज्यातील ४४ हजार २७८ गावांमधील सुमारे एक लाख ३२ हजार ८३४ प्रकरणे मार्गी लागणार असून सुमारे २६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांमधील वाद मिटणार आहे. राज्यात जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्काबाबतचे वाद, शेत बांधावरून होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेत जमीन मोजणीवरून होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरुन होणारे वाद, शेती वहीवाटीचे वाद, भावा-भावांतील वाटणीचे वाद, शासकीय योजेनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वाद इत्यादी कारणांमुळे शेतजमिनीचे वाद आहेत. शेतजमिनीचे वाद अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालय आणि प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी हे वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर वाद संपुष्टात येण्यासाठी शासनाने सलोखा योजनेला मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाचे सह सचिव श्रीधर डुबे पाटील यांनी प्रसृत केला आहे.

सलोखा योजनेच्या अटी

- ही योजना दोन वर्षांसाठी असेल
- शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान १२ वर्षांपासून असला पाहिजे.
- अकृषिक, रहिवासी तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनींसाठी ही योजना लागू नाही.
- दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवित आहे, अशा प्रकारची अट दस्तामध्ये समाविष्ट करणे आवश्यक.
- वस्तुस्थितीदर्शक पंचनामा मंडल अधिकारी, तलाठी यांनी नोंदवून घ्यायचा असून पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले जाईल.
- पंचनामा प्रमाणपत्र अदलाबदल दस्तास जोडणे आवश्यक.

पुण्यात दर महिन्यात 'प्लेसमेंट ड्राईव्ह'

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : नोकरीसाठी इच्छुक तरुणांना नामवंत खासगी कंपन्या, कारखाने, उद्योगसमूह यांच्या माध्यमातून उत्तमोत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे प्रत्येक महिन्याला रोजगार मोहीम अर्थात 'प्लेसमेंट ड्राईव्ह'चे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत पहिला ह्यप्लेसमेंट ड्राईव्हह्ण येत्या ११ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे कार्यालय वेळोवेळी जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात रोजगार मेळावे आयोजित करून, सर्व स्तरातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचाच पुढील टप्पा म्हणून आता प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात विविध पदांसाठी वेगवेगळ्या पात्रतेच्या उमेदवारांच्या तत्काळ नोकरभरतीची गरज असलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी उमेदवारांच्या थेट प्रत्यक्ष मुलाखती घेण्यासाठी निमंत्रित करण्यात येईल. प्रत्यक्ष मुलाखत देऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल.

पुणे जिल्ह्यातील नोकरीसाठी इच्छुक तरुण-तरुणींनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी. होमपेजवरील नोकरीसाधक (जॉब सीकर) लॉगिन मधून युझर आयडी आणि सांकेतिक क्रमांकाद्वारे (पासवर्ड) लॉगिन करावे. लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्ड मधील 'पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर' या बटनावर क्लिक करून प्रथम पुणे विभाग आणि नंतर पुणे जिल्हा निवडून त्यातील 'फर्स्ट प्लेसमेंट ड्राइव्ह- पुणे' या रोजगार मेळाव्याची निवड करावी. उद्योजकनिहाय रिक्तपदांची माहिती घेऊन पात्रतेनुसार रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम नोंदवणे आवश्यक आहे.

ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांनी बुधवारी (११ जानेवारी) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे सर्व कागदपत्रांसह उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी होऊन या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी साहाय्यक आयुक्त सागर मोहिते यांनी केले.

अनावश्यक वाद टाळणे गरजेचे - डॉ. न. म. जोशी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सध्या विविध स्तरावर सातत्याने होणारे अनावश्यक वाद देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने धोक्याचे आहेत. ते टाळणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ-साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांनी व्यक्त केले.

दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळेस शिक्षिका, बालसाहित्यकार व किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांच्या मातोश्री श्रीमती इंदिरा अत्रे यांचे नाव देण्यात आले. त्या प्रसंगी जोशी बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष संजीव महाजन, भारत वेदपाठक, सचिव भारती एम.डी., खजिनदार नीलेश येवलेकर, मुख्याध्यापिका समीक्षा गायकवाड आणि ग्रंथपाल प्रसाद भडसावळे या वेळी उपस्थित होते.

डॉ. प्रभा अत्रे म्हणाल्या, 'आईच्या कविता, बालनाटिकांचे लेखन लहान वयात पहात, ऐकत असल्याने कदाचित तो प्रभाव माझ्या सांगीतिक रचना, कविता आणि बंदिश निर्मितीवर झाला असावा. आम्हा मुलींना वाढविताना, शाळेला तिसरी मुलगी मानणारी आई शाळेतील गरजू मुलांच्या गरजाही ममतेने पूर्ण करीत असे. घरी प्रेमाने वागणारी आई शाळेत मात्र कडक शिस्तीची होती.'

मुलांनी इंदिरा अत्रे यांच्या कवितांवर आधारित गाणी आणि नृत्याचे सादरीकरण केले. कल्पना गुजर यांनी सूत्रसंचालन केले.

समकालीन बदलांचा व्यवसायांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास आवश्यक - गिरीश चितळे

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'व्यवसाय वाढविण्यासाठी पुढील किमान दहा वर्षांचा अंदाज घेता आला पाहिजे. मात्र, समकालीन बदलांमुळे अनेक उद्योगांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे समाजाच्या बदललेल्या गरजा आणि त्या पूर्ण करणाऱ्या व्यवसायांवर अधिक अभ्यास करणे गरजेचे आहे,' असे मत 'चितळे उद्योग समूहा'चे भागीदार गिरीश चितळे यांनी गुरुवारी व्यक्त केले.

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर'तर्फे (एमसीसीआयए) गिरीश चितळे यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. 'एमसीसीआयए'चे अध्यक्ष दीपक करंदीकर आणि महासंचालक प्रशांत गिरबने या वेळी उपस्थित होते.

चितळे म्हणाले, की व्यवसाय उभा करण्यामध्ये पूर्वी दोन ते तीन पिढ्या जात. मात्र, आता एका पिढीच्या अर्ध्या वयातच कंपनी कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय करीत आहे. अनेक स्टार्टअप पाच वर्षांत युनिकॉर्न झाले. व्यवसायांचा आवाका बदलत असल्याचे यातून स्पष्ट होते. त्यामुळे खर्च करण्याच्या बाबतीत आपल्यात कोणते बदल झाले आहेत, याची नोंद घेत त्यावर अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी एमसीसीआयएने पुढाकार घ्यावा.

प्रणव येळगावकर, प्रकाश मालाडकर, निमिष देसाई, आनंद भंडारी आणि नीलेश करंदीकर यांना गो. स. पारखे पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंदार पारखी, विजय मेहता, हिमांशू गोयल यांना हरी मालिनी जोशी पुरस्कार, तर अनिता कुलकर्णी-पुराणिक यांना रमाबाई जोशी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संदेश सालियन, जयंत कोंडे आणि संजय चौधरी यांना डॉ. आर. जे. राठी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुण्यातील प्रसिद्ध सनदी लेखापालाकडे खंडणीची मागणी; गुन्हे शाखेकडून आरोपीला अटक

पुणे : शहरातील एका प्रसिद्ध सनदी लेखापालसह (चार्टर्ड अकाउंटंट) त्याच्या संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देत ३० लाखांची खंडणी मागणाऱ्याला गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने अटक केली. गरवारे पूल परिसरात पैसे नेण्यासाठी आला असता त्याला सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

किरण रामदास बिरादार (वय २४ रा. मांजरी. मूळ. रा. लातूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत मुकुंदनगर येथील एका सनदी लेखापालाने तक्रार केली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरोपी बिरादारने अनोळखी क्रमांकावरून दूरध्वनी करून तक्रारदाराकडे पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास मुलांना व त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. सातत्याने धमक्या येत असल्याने तक्रारदाराने पोलिसांकडे धाव घेतली. आलेल्या तक्रार अर्जाची चौकशी करून गांभीर्य लक्षात घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या पथकाने तपास सुरू केला. या दरम्यान आरोपीने गुरुवारी तक्रारदाराला दूरध्वनी करून पैसे घेऊन गरवारे पूल परिसरात बोलावले. त्यानुसार युनिट दोनच्या पथकाने गरवारे पूल परिसरात सापळा रचून बिरादार याला ताब्यात घेतले. पोलीस असल्याचा संशय येताच आरोपी मोबाइल फेकून पळून जावू लागला. मात्र, पथकाने पाठलाग करून बिरादार याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट दोनचे वरिष्ठ निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही कारवाई केली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18
वृक्ष प्राधिकरण

जाहीर नोटीस

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन व अधिनियम 1975 चे कलम 8 -3 अन्वये जाहिर नोटीस देणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **माहे-डिसेंबर, 2022 ते जानेवारी-2023** या कालावधी मधील धोकादायक वृक्ष काढणे/वृक्षारोपण करणे या प्रकरणांना परवानगी देणेचा प्रस्ताव मा. वृक्ष प्राधिकरणा समोर आहे. याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास त्या संदर्भात लेखी निवेदन अथवा तक्रार वृक्षाधिकारी, पिंपरी चिंचवड म. न. पा. कार्यालयाचा पत्ता- यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प उद्यान, टी ब्लॉक, हॉकी स्टेडीयमजवळ, नेहरूनगर, भोसरी पुणे - 411026 यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन चार दिवसाचे आत समक्ष सादर करणेत यावेत.

सदर बाबत अधिक तपशिलवार माहिती वृक्षाधिकारी, पिंपरी चिंचवड मनपा याचे कार्यालयात कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरीकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सही/-
वृक्षाधिकारी
उद्यान/वृक्षसंवर्धन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-18

जाहिरात क्रमांक - ४१५
क्रमांक- वृक्ष/3अ/कावि/21/2023
दिनांक-5/1/2023

POONAWALLA HOUSING FINANCE Apna Ghar, Apni Pehchan

पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची मॅग्ना हाउसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)
नोंदणीकृत कार्यालय : ६०२, ६वा मजला, झीरो वन आयटी पार्क, सर्व्हे नं. ७९/१ घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-४११०३६, महाराष्ट्र

ई-लिलाव विक्री सूचना

सर्फेसी कायद्या अंतर्गत सुरक्षित स्थावर मत्तेची विक्री

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको / सह-ऋणको / हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की मॅग्ना हाऊसिंग फायनान्स लि.कडे, आताची "पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" म्हणून आता दुसरे नाव झाले आहे, मालमत्तेचा ताबा सर्फेसी कायद्याच्या कलम १३(४) / १४ अंतर्गत कंपनीच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला होता, सदर मालमत्तेची विक्रि लागू व्याज, आकार व किंमत, इ.सह कंपनीच्या थकित देणींच्या वसूलीकरिता खाली नमूद केलेल्या अटींच्या अनुसार ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. वर्णिलेल्या मालमत्तेची विक्रि सुरक्षित हित (अंमलबजावणी) नियम (यापुढे नियम म्हणून संदर्भित) च्या नियम ८ व ९ अंतर्गत **"जसे आहे जेथे आहे, जे काही आहे तेथे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय"** या तत्वावर करण्यात येणार आहे. विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **www.poonawallahousing.com** या "पीएचएफएल" / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना तारीख व थकित रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत (ई)	इरठे (राखीव किंमतीच्या १०%) (एफ)	इरठे सादरीकरणाची तारीख (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के)
लोन नं. : एचएल/०११५/एच/१९/१०००१० व एचएल/०११५/एच/१९/१०००१२ शिवाजी अंबादास राजगुरू (ऋणको), दैवशाला शिवाजी राजगुरू, नवनाथ शिवाजी राजगुरू, राजगुरू फूटवेअर, राजगुरू फुटवेअर (सह-ऋणको)	सूचना तारीख : ३१/०५/२०२१ व १८/०८/२०२२ एकूण देणी : रु. १८०३१५१/- (रुपये अठरा लाख तीन हजार एकशे एकावन्न फक्त) वसुलीपर्यंत १४.००% प्र. व. दराने व्याजासह ३१/०५/२०२१ रोजी प्रमाणे देय आणि रु. २९९१४३.२० पै./- (रुपये दोन लाख नव्वण्णव हजार एकशे त्रेचाळीस व पैसे वीस फक्त) वसुलीपर्यंत १४.००% प्र. व. दराने व्याजासह १८/०८/२०२२ रोजी प्रमाणे देय	प्रत्यक्ष	फ्लॅट नं.१०(जीपी फॉर्म ८ नुसार), फ्लॅट नं. २०३ (ऑर्किटेक्ट प्लान व अन्य रेकॉर्ड्स नुसार), दुसरा मजला, मंगलमुर्ती हाईट्स, सर्व्हे नं. ३९, हिस्सा नं. १, ग्रामपंचायत मिळकत नं. २२५१/९, सुमारे मोजमापाचा ५५.०१ चौ.मी., येथे स्थित - आंबेगाव खुर्द, ता. हवेली, ग्रामपंचायत आंबेगाव खुर्दच्या मर्यादित. पुणे पीन : ४११०४६.	रु. १७,८१,५००/- (रुपये सतरा लाख एक्याऐंशी हजार पाचशे फक्त)	रु. १७८,१५०/- (रुपये एक लाख अठ्ठ्यात्तर हजार एकशे पन्नास फक्त)	०९/०२/२०२३ रोजी सायं ०५.०० वा. पूर्वी	१०,०००/-	०३/०२/२०२३ (स.११.०० - दु. ०४.००)	१०/०२/२०२३ (स. ११.०० - दु. ०२.००)	काही नाही

अधिक सविस्तर माहिती व शंकाकरिता, सपर्क - प्राधिकृत अधिकारी, नाव - श्री. इक्बाल आलम (मोबा. # ९९५८१९५४५३)

स्वारस्य असलेल्या बोलीदार / खरीददारांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी लिलावात ठेवलेली मालमत्ता व "पीएचएफएल" शाखेला भेट द्यावी, आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत त्यांचे / तिचे / त्यांचे समाधान करून घ्यावे तसेच स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त आकार, भार व कोणतही प्रत्यस्थ पक्षकाराचे हित निश्चित करावेत. मालमत्तेशी सलग्न मालमत्ता कर, विद्युत / पाणी देय आणि अन्य कोणतीही देणी, जर असल्यास, निश्चित केली पाहिजे आणि / यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करावयाची आहेत.

स्वारस्य असलेल्या बोलीदार / खरीददारांना ई-बोलीकरिता स्वतःची नोंदणी करून घेणे अनिवार्य आहे आणि खाली नमूद केलेल्या लिलाव सेवा-पुरवठाकाराचे वेब पोर्टल **https://DisposalHub.Com** यावरून ई-लिलावावरील प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा आणि त्याआधीच लॉग-इन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. **मेसर्स नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड - #२०३, दुसरा मजला, श्री शाम पॅलेस, सेक्टर : ४ व ५ क्रॉसिंग, रेल्वे रोड, गुरुग्राम - १२२ ००६ (संपर्क क्र. +९१ ९३१०० २९९३३ / +९१ ९८१०० २९९२६ / +९१ १२४ ४ २३३ ९३३), संपर्क क्लाईंट सर्व्हिस डिलिव्हरी (सीएसडी) सेल नं. (एम) +९१ ९३१०० २९९३३/ +९१ ९८१०० २९९२६ (थेलि) +९१ १२४ ४ २३३ ९३३** ईमेल आयडी : **CSD@DisposalHub.Com** स्वारस्य असलेले खरीददार / बोलीदारांनी ०९/०२/२०२३ पर्यंत कोणत्याही नॅशनलाईज्ड किंवा शेडयूल्ड बँकेवर काढलेली "पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड", आयसीआयसीआय बँक लि., खाते क्र. ०००६५१०००४६०; आयएफएससी कोड - आयसीआयसी०००००००६, २०, आर.एन. मुखर्जी रोड, कोलकाता-७००००१ यांच्या खात्यात एनईएफटी / आरटीजीएस / डीडी द्वारा इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करावी. वेब पोर्टल नोंदणीनंतर, स्वारस्य असलेल्या बोलीदार / खरीददारांनी अपलोड व ईमेल केलेल्या बोली कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे व स्वयं-साक्षांकित प्रत प्राधिकृत अधिकारी, **श्री. तुषार स्वामी** यांना **पत्ता : ६०२, ६वा मजला, झीरो वन आयटी पार्क, एसआर नं. ७९/१, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-४११०३६. मोबा नं. ९६७३८००२७७, ईमेल आयडी : tushar.swami@poonawallahousing.com** यावर पाठवावी.

तारीख: ०६.०१.२०२३
स्थळ: मुंबई

प्राधिकृत अधिकारी
पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची मॅग्ना हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रा विशेष

यात्रासहल

विनोद स्थापना 1995 **हॉलिडेज**
नेपाळ - मुक्तीनाथ (13 दि.) 31 मार्च ते 12 एप्रिल, 21 एप्रिल ते 3 मे
चारधाम - उत्तराखंड (14 दि.) 25 एप्रिल ते 8 मे, 14 ते 27 जुन
सपुंर्ण हिमाचल (13 दि.) 1 ते 13 मार्च, 2 ते 14 मे
काश्मिर - वैष्णोदेवी (11 दि.) 16 ते 26 मार्च, 20 ते 30 एप्रिल, 5 ते 15 मे
काश्मिर-लेह लडाख (14 दि.) 21 मे ते 4 जुन, 3 ते 16 जुन
संपुर्ण सिक्कीम (10 दि.) 21 ते 30 एप्रिल, 19 ते 28 मे
भुतान (7 दि.) 12 ते 18 एप्रिल, 20 ते 26 मे
पुर्वांचल (सेव्हन सिस्टर्स) (21 दि.) 1 ते 21 एप्रिल
नागालॅंड, मणीपूर, मिझोराम, त्रिपूरा (10 दि.) 1 ते 10 एप्रिल
आसाम, मेघालय, अरूणाचल (11 दि.) 10 ते 21 एप्रिल
सहल खर्चात सर्व बाबी समाविष्ट
9869573097
9372453762
0070820323-2-2

''हिमसेतू टूर्स'' 9920173723/ 8879298666 * महाराष्ट्रातील ५ ज्योतिर्लिंग- १६/२/२०२३ * आसाम- अरुणाचल- मेघालय- त्रिपुरा- मणिपूरसह- १६/३/२०२३, १६/४/२०२३ * काश्मिर- वैष्णोदेवी- अमृतसर.
0070785167-9

श्रीरामकृष्ण - चारधाम यात्रेचे - लाखामंडलसह- २४-०४-२०२३/ ०६-०५-२०२३ - बुकिंग जोरात सुरू// शास्त्रोक्त- नर्मदापरिक्रमा- ०१/०२/२०२३// श्रीमद्भागवत- सप्ताह- नैमिषारण्यात- त्रिस्तळीयात्रेसह- २०-०२-२०२३// कुरवपूर- पिठापूर- १९/०२/२०२३// कर्नाटक- कुर्गसह- ०६-०२-२०२३// आसाम// हंपी- बदामी// सिक्कीम - दार्जिलिंग - भुतान// लेह-लडाख// काश्मिर// सिमला// रत्नागिरीतील वानप्रस्थाश्रमास भरघोस प्रतिसाद// बापट - ९८२००२३१०६/ ९१३७००१३९५.
0070802458-10

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग दर रविवारी 'लोकसत्ता'तून जीवनसाथी

नोकरीविषयक

आयुर्वेदिक कंपनीसाठी शिक्षित/ बेरोजगार, महिला/ पुरुष घरी बसून औषध पॅकिंग करून, दरमहा २५,०००/- - ३०,०००/- कमवा. (१००% नोकरी) 2150 NOC शुल्क. संपर्क: 6372144113.
0070819391-7

विवाहविषयक

वधू-वर मेळावा

अखिल महाराष्ट्र विश्वकर्मा सुतार समाज महासंघ, पुणे आयोजित राज्यस्तरिय भव्य वधू-वर व पालक परिचय मेळावा. रविवार, दिनांक ०८ जानेवारी, वेळ स. ८ ते सायं. ६ वा. स्थळ- गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे. संपर्क- ९८२२३५५६८२/ ९८५०६२६६०१.
0090317520-1

मालमत्ताविषयक

प्लॉट विक्रीविषयक

क्लीअर टायटल, निसर्गरम्य प्रदूषणमुक्त नागांव - अलिबागमध्ये 42.5गुंठे रिसॉर्ट प्लॉट +3बंगले विकणे. आंबा, नारळ खूप झाडे! जोशीः 9653231807/ 8850642600.
0090316171-1

कर्जविषयक

बालाजी फायनान्स सर्व प्रकारचे लोन NRI, प्रायव्हेट फायनान्स १ लाख - ५ करोड पर्यंत वार्षिक ५% व्याजाने ५ दिवसात मिळेल. 8368151886.
0070820515-1

कर्जत, लोणावळा, पाचगणी, पानशेत, मुळशी डॅमटचव्हीवला टुरिस्ट प्लॉट. कोकणात विविध ठिकाणी स्वस्तात जमिनीसाठी 9867934314/ 8625949963.
0070820666-1

नावात बदल

मी माझे नाव सुनीता मल्हारी करगल च्याऐवजी सुनीता मल्हारी करगल असे बदलले आहे. पत्ता- ६५१/०२/०१/२३, कुर्डूवाडी रोड, बार्शी-४१३४०१
0090317585-4

मी माझे नाव मल्हारी नारायण करगल च्याऐवजी मल्हारी नारायण करगल असे बदलले आहे. पत्ता- ६५१/०२/०१/२३, कुर्डूवाडी रोड, बार्शी-४१३४०१
0090317585-3

My old name is Ranju Radhakrishnan Menon change to new name Ranju Deepesh Menon as per Gazzet no.(P_2253450)
0090317588-1

My Old Name Rajashekhara Hegde Change To New Name Rajshekhar Subbanna Hegde as per Affidavit no. 4808.
0090317573-2

My old name is Popat Prabhu More change to new name as Ajay Prabhu More Vide Affidavit no. 2935 - dated 05/01/2023.
0090317569-5

My old name was Ratan Vithal Pawar After Marriage Changed To Ratnamala Santosh Bhosale Vide Aff. No. 4154/2023 Dated 03/01/2023.
0090317508-1

I Army No 154122771F Rank HAV Sanjiv Shinde Books of Record Wife Name Malapuri incomplete, Complete Name Malapuri Sanjiv Shinde DOB 13/07/1991 Affidavit 165P, 3rd Jan 2023.
0090317601-1

I hitherto known as Chougule Babasaheb Dnyanadeo alias Babasaheb Dnyanadeo Pawar son of Dnyanadeo Bhau Chougule residing at Plot No 9, Government Colony, Near Khasadar Bhavan, Vishrambag, Sangli, Maharashtra 416416 have changed my name and shall hereafter be known as Babasaheb Dnyanadeo Pawar.
0090317581-1

My old name is Sumeet Sony Changed to new name as Sumit Soni vide Affidavit No 106/2023 Dated 04/01/2023
0090317592-2

My old name is Mohamed Rafik Shaikh Ismail changed to Rafik Ismail Shaikh affi no P-544/2023 dated 05/01/2023
0090317593-1

My old name is Kaif Ahmed Kazi change to new name as Kaif Ahmed Aminuddin Kazi Vide Affidavit no. 2934 - dated 05/01/2023.
0090317569-4

My old name is Gulnazbano Faiyaz Khan Inamdar change to new name as Gulnaz Asif Shaikh Vide Affidavit no. 2930 - dated 05/01/2023.
0090317569-2

My old name is Eiaz Gafur Shaikh change to new name as Ejaz Gafur Shaikh Vide Affidavit no. 2936 - dated 05/01/2023.
0090317569-6

My old name Miss Geeta Narayandas Kukreja changed to new name Mrs.Mamta Lalit Keswani by affidavit no. 09/2023 dated 04.01.2023.
0090317595-1

My old name is Deepesh Gokuldas changed to new name Deepesh Gokuldas Menon as per Gazzet no.(P_2250522).
0090317588-2

My old name is Arya Nambudri Changed to new name as Arya Namboodiri vide Affidavit No 107/2023 Dated 04/01/2023
0090317592-3

My old name is Abida Jamilur Rahman Ansari change to new name as Abida Jamil Ansari Vide Affidavit no. 2929 - dated 05/01/2023.
0090317569-1

My old name Dattatraye Balwant Maskar changed to Dattaram Balwant Maskar affi no P-543/2023 dated 04/01/2023.
0090317593-2

My old name Barkatullah Shaikh changed to Barkat Ali Shaikh by affidavit no-13/2023.
0090317586-1

My Old Name Jugalkishore Kishanlal Tapadiya Change To New Name Jugalkishor Kishanlal Tapadiya as Per Affidavit No.5236.
0090317573-3

My Old Name Jayakumari Hegde. B. Change To New Name Jaya Rajshekhar Hegde as per Affidavit no.4809.
0090317573-1

I have changed my name from Sweety Chhatwal Johar to Sweety Ankit Johar as per Affidavit No 36AA620047 Dated 26/12/2022
0070820781-1

I Firdosh Navalshaw Deboo have changed my name to Firdos Naval Deboo as per Affidavit Number 5/2023 Dated 03-01-2023
0090317571-2

My old name is Kancharla Sarojini Changed to new name as Kancharla Sarojanamma vide Affidavit No 105/2023 Dated 04/01/2023.
0090317592-1

My old name is Pramila Kumari Das change to new name as Pramila Kumari Vide Affidavit no. 2933 - dated 05/01/2023.
0090317569-3

I have changed my name from Anshu to Anshu Mishra as per document
0070820785-1

I have changed My Old Name Shree Sachin Khandagale to New Name Shree Mahapatra Affidavit 440/2022 Dt 03/03/2022.
0090317600-1

I Mamta Wife Of No 2797735K Hav Pramodkumar, Declared That My Name Has Been Changed From Mamtha To Mamta As Per Affidavit No. 15/2023.
0090317578-1

I Harsha Vinod Gidwani have changed my name to Hersha Vinod Gidwani as per Affidavit number 4/2023 dated 03-01-2023
0090317571-1

I Army No 154122771F Rank HAV Sanjiv ShindeBooks of Record Daughter's Name Nidishri incomplete, Complete Name Nidishri Sanjiv Shinde DOB 09/05/2014 Affidavit 166B , 3rd Jan 2023
0090317601-2

मी नीरज सहरावत, R/o, SMQ 635/10 AFS Lohegaon, Pune लग्नानंतर माझे नाव बदलून नीरज देवी असे ठेवले आहे.
0050211090-1

छोट्या जाहिराती स्वीकारण्याची केंद्रे

सदाशिव पेठ
डॉल्फिन ॲडव्हर्टायझिंग राही चेंबर्स, २०, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०. फोन २४३३३७७२, ९८२२२१४८७२.
शिप्रा असोसिएट्स डेपो. प्रशांत कदम, ५६७, सदाशिव पेठ, पायोनिर हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणे. फोन २४४६५३३५, २४४५२५००.
सुरेखा ॲडव्हर्टायझिंग सर्व्हिस सचिन एस. पाटील, १२६४, ओम अपार्टमेंट, लेन नं. ६, शुभनगर, बाजीराव रोडजवळ, वाडिया हॉस्पीटलसमोर, पुणे. फोन २४४८४१०६, ९८२३४७७२२३.
पल्लवी ॲड्स श्री. सचिन पांडुरंग रासकर, १४३७, नंदन अपार्टमेंट्स, एस. पी. कॉलेजसमोर, सदाशिव पेठ, पुणे. मोबा. ९६०४३५१०१०.
रावेल ॲड्स बी-२०४, आकृती संकुल, पाचवा मजला, विजयनगर कॉलनी, टिळक रस्ता,सोनी शोरूममागे,सदाशिवपेठ, पुणे-३०. फोन २४३३३१२१/२.

सांगवी
प्रतिबिंब पब्लिसिटी श्री. विजय विनायक गायकवाड, ३७, बुध घोश हौ.सो., जुनी सांगवी, पुणे-४११०२७. मोबा. ९८२२३४३३४५, ९८९०७८७९४६
व्ही. आर. ॲडव्हर्टायझिंग श्री. विनायक भुजबळ, ९, गुडविल पार्क, लेन नं. २, कृष्णानगर, स.नं. ७१/१/२, नवी सांगवी, पुणे-४११०२७. मोबा. ९९२२६१३७७५, ९७६७९७३६६५

सिंहगड रस्ता
एस. क्लासिफाईड ऑफिस नं. १०५, मोहिते पॅराडाईज, पहिला मजला, कासट सिलेक्शन बिल्डिंग, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे-५७. फोन २४३५४०८५, २४३५२५६०.

शनिपार
विविध सेवा १४८१, शुक्रवार पेठ, शनिपार, मंडई रस्ता, पुणे-४११००२. फोन २४४६६६८४, २४४३२०७१, मोबा. ९३७३०८२४४४.

तळेगाव दाभाडे
चक्रधर ॲडव्हर्टायझिंग १०९, सी-१, कलश अपार्टमेंट, राव कॉलनी, भंडारी हॉस्पीटलमागे, तळेगाव दाभाडे. मोबा. ८८५५८७३५००/ ९६७३१२९९७३

15 वर्षांची विश्वासार्हता TRAVEL EXPERTS INDIA
मॅजिकल युरोप